पाक्षिक
प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई • वर्ष: 7 • अंक: 8 • 16 एप्रिल 2025 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.



स्थापना दिन विशेष

# कार्यकर्त्यांचा पक्ष





अध्यक्षीय मनोगत

# भाजपाची वैचारिक बांधिलकी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीची देशभर विजयी घोडदौड चालू आहे. मोदीजींच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा भाजपा आघाडीने केंद्रात सरकार स्थापन केले. अनेक राज्यांमध्ये भाजपाला विजय मिळाला. महाराष्ट्रात मोदीजींच्या प्रेरणेने आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपाची विजय यात्रा चालू आहे. राज्यातही भाजपाने सलग तीन विधानसभा निवडणुकांमध्ये शतक ठोकण्याचा पराक्रम केला आहे. पंचायत ते पार्लमेंट असा सर्वत्र भाजपाचा झेंडा फडकत असताना आपण नुकताच भाजपाचा स्थापना दिवस साजरा केला. त्यानिमित्ताने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. जगत प्रकाश नड्डा जी यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संपादित अंश 'मनोगत'च्या या अंकात प्रसिद्ध केला आहे. कार्यकर्त्यांनी तो अवश्य वाचावा. भाजपाने विचारसरणीशी कधीही तडजोड केली नाही हे मा. नड्डाजी यांचे मत भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेषतः नव्या पिढीतील कार्यकर्त्यांनी ध्यानात ठेवण्याची गरज आहे. आजचा विजयी आणि वैभवशाली भाजपा पक्षाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी केलेल्या त्याग आणि परिश्रमामुळे येथेवर पोहोचला आहे. भाजपाची स्थापना १९८० साली झाली. त्यापूर्वी जनसंघ होता. आधी जनसंघाच्या काळात आणि नंतर भाजपाची स्थापना झाल्यावरही पक्षाच्या वैचारिक भूमिकेत कमालीचे सातत्य आहे. हिंदुत्व हा आमचा श्वास आहे आणि एकात्म मानववाद हा आमचा विचार आहे. जनसंघ उभा करणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या एकात्म मानववादाचा गाभा अंत्योदय आहे. आजही भाजपा आपल्या विचारांवर ठाम आहे आणि त्यानुसारच सरकार चालवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यशस्वीपणे राबविलेल्या गरीब कल्याणाच्या अनेक योजना म्हणजे अंत्योदयाचा विचार प्रत्यक्षात उतरविणेच आहे. नुकतेच संसदेने वक्फ सुधारणा विधेयक मंजूर केले. त्याचा उद्देश मुस्लिम समाजातील शेवटच्या रांगेत असलेल्या गरिबांना आणि पीडीतांना न्याय देण्याचा आहे. या विधेयकावर बोलताना केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शाह यांनी स्पष्ट सांगितले, वक्फ बोर्डाच्या संपत्तीचा उपयोग गरीब मुसलमान, घटस्फोटित महिला, अनाथ मुले, बेरोजगार युवक आणि गरजूंच्या कल्याणासाठी व्हायला हवा. मा. अमितभाईंच्या संसदेतील भाषणावर आधारित एक लेख या अंकात आहे, तो सर्वांसाठी मार्गदर्शक आहे. मोदी सरकारने अंत्योदयाच्या मार्गावर चालताना कधीही जात पात धर्म असा भेदभाव केला नाही. रांगेतील शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहोचला पाहिजे, हा दीनदयाळजींनी सांगितलेला विचार मोदीजींनी अंमलात आणला. राम मंदिर उभारणे असो अथवा घटनेचे ३७० वे कलम रद्द करणे असो, भाजपा कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्यांनी वैचारिक सातत्य राखत ध्येय साध्य केले. वैचारिक बांधिलकी हे भाजपाचे वैशिष्ट्य आहे आणि तेच पक्षाचे बळ आहे. आज भाजपा चहुबाजूंनी विस्तारत आहे. विविध पक्षांमधील कार्यकर्ते पक्षात सामील होत आहेत. काळानुरूप पक्षाचे स्वरूप बदलणे स्वाभाविक आहे, पण पक्षाची वैचारिक बांधिलकी सदैव तशीच राहील, याची मला खात्री आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर–वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

भाजपाने विचारसरणीशी कधीच तडजोड केली नाही ............ ०४



हा कार्यकर्त्यांचा पक्ष ............ ०८




नव्या वक्फ कायद्यामुळे गोरगरीब मुस्लिमांना फायदा ............ १०



नगण्य ते क्रमांक एक ............ १३



कार्यकर्त्यांच्या क्षमता विकासाची व्यवस्था करणारा पक्ष ............ १६



आणखी एक संकल्पपूर्ती ............ १९



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२–२२०२२०५०

# भाजपाने विचारसरणीशी कधीच तडजोड केली नाही



● जे.पी. नड्डा, राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री

स्थापना दिनानिमित्त राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांच्या हस्ते केंद्रीय मुख्यालयात ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय संघटन मंत्री बी.एल.संतोष, राष्ट्रीय सरचिटणीस दुष्यंत गौतम, विनोद तावडे, खा. अरुण सिंग, डॉ.राधामोहन दास अग्रवाल, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, खा. बांसुरी स्वराज आदी उपस्थित होते. यावेळी श्री. नड्डा यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संपादित अंश.

**स्थापना** दिनानिमित्त मी सर्वप्रथम देशभरातील कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतो. १९५१ मध्ये जनसंघाच्या स्थापनेनंतर आपल्या राजकीय प्रवासाला प्रारंभ झाला. अत्यंत कठीण स्थितीतून वाटचाल करत आपण आज येथपर्यंत पोहचलो आहोत. जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी पक्षाला दिलेल्या विचारसरणीच्या आधारावरच आपली वाटचाल सुरू आहे. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांची 'सबका साथ, सबका विकास'ची संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षात आपल्या सरकारच्या माध्यमातून प्रत्यक्षात आणली आहे. १९७७ मध्ये आणिबाणीच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे जनसंघाचे जनता पार्टीत विलीनीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. ६ एप्रिल १९८० रोजी जनसंघरूपी राष्ट्रवादी विचारसरणीचे रूपांतर भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेत झाले. देशात पर्यायी राजकीय संस्कृती निर्माण करण्याच्या प्रवासाला ४५ वर्षे पूर्ण झाली



आहेत. जनसंघाला आणि भारतीय जनता पार्टीला प्रारंभीच्या काही वर्षात आपले अस्तित्व राखण्यासाठी, आपली नवी ओळख निर्माण करण्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागली, मोठा संघर्षही करावा लागला. कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्यांनी योगदान दिल्यामुळेच भारतीय जनता पार्टीचा विस्तार झाला आहे. या कार्यकर्त्यांच्या समर्पणाला माझे वंदन. भारतीय जनता पार्टीची स्थापना झाली त्यावेळी आपण सत्तेत येऊ, अशी शक्यता दूर-दूर वरही दिसत नव्हती. तरीही आपण योग्य मार्गाने चाललो आहोत, याची खात्री आपल्या नेतृत्वाला होती. अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांनी प्रतिकूल स्थितीपुढे हार न मानता मोठ्या जिद्दीने पक्ष वाढीसाठी संघर्ष केला. राष्ट्रीय नेतृत्वाच्या खंबीरपणामुळेच सामान्य कार्यकर्तेही पक्षाचे काम अविरत करत राहिले. या संघर्षात्मक वाटचालीची परिणती आज भाजपा हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनण्यात झाली आहे. आपल्या नेतृत्वाने मते मिळवण्यासाठी पक्षाची विचारधारा कधीच गहाण टाकली नाही. मते मिळाली नाही तरी चालतील, पण आम्ही आमच्या तत्वांशी तडजोड करणार नाही, या निर्धाराशी आपले पक्ष नेतृत्व ठाम राहिले. विचारसरणीशी तडजोड न केल्यामुळे आपल्या पक्षाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली. २२ ते २५ एप्रिल १९६५ या काळात भारतीय जनसंघाचे कालिकत येथे राष्ट्रीय अधिवेशन झाले होते. या अधिवेशानात पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी एकात्म मानववादाचा सिद्धांत मांडला. त्या काळात राजकीय सिद्धांत, विचारसरणी याकडे कार्ल मार्क्सच्या चष्म्यातून पाहिले जात असे. त्यामुळे एकात्म मानववादाच्या सिद्धांताची टिंगळटवाळी झाली. काँग्रेसने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या मूळ विचारसरणीला हळूहळू सोडचिठ्ठी दिली, तेव्हापासून काँग्रेसची घसरण सुरू झाली. भारतीय जनता पार्टीने सत्तेत आल्यानंतर कधीच आपल्या विचारसरणीशी फारकत घेतली नाही. समाजात शेवटच्या पायरीवर उभ्या असलेल्या माणसाचा विकास झाल्याखेरीज देश प्रगतीपथावर जाणार नाही, असे दीनदयाल उपाध्याय यांनी म्हटले होते. त्यांचा हा अंत्योदयाचा सिद्धांत प्रत्यक्षात आणण्याचे प्रयत्न भारतीय जनता पार्टीने आपल्या सरकारच्या माध्यमातून केले आहेत. १९७० आणि १९८०, १९९० च्या दशकात काही राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टीला सत्तेची संधी मिळाल्यावर अंत्योदयावर आधारीत योजनांची अंमलबजावणी केली गेली. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यावर 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या मंत्राच्या आधारे अंत्योदय संकल्पना



राबिवली आहे.

भारतीय जनता पार्टी आज केंद्रात आणि अनेक राज्यांमध्ये सत्तेवर आहे. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाल उपाध्याय, अटल बिहारी वाजपेयी, कुशाभाऊ ठाकरे, जगन्नाथराव जोशी या सारख्या मंडळींनी घालून दिलेल्या वैचारिक पायाच्या आधारावरच आपल्याला आज सत्ता मिळाली आहे. राष्ट्रवाद आणि अंत्योदयाच्या विचारसरणीची वर्षानुवर्षे पायाभरणी केल्यानंतरच आपल्या डोक्यावर सत्तेचा मुकूट दिसत आहे. जम्मू-काश्मीरसाठी ३७० वे कलम लागू केल्यामुळे एकाच देशात दोन कायदे, दोन नियम, दोन राष्ट्रध्वज अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. याला प्रखर विरोध करत डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. १९५१ मध्ये डॉ.मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. १९५३ मध्ये डॉ.मुखर्जी यांनी जम्मू-काश्मीरसाठीच्या ३७० व्या कलमाला विरोध करण्यासाठी राष्ट्रव्यापी आंदोलन सुरू केले. या आंदोलनाबद्दल डॉ.मुखर्जी यांना अटक करण्यात आली. तुरुंगात असताना डॉ.मुखर्जी यांचा संशयास्पद स्थितीत मृत्यू झाला. डॉ.मुखर्जी यांच्या आईने त्यावेळचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्याकडे डॉ.मुखर्जी यांच्या मृत्युची चौकशी करण्याची मागणी केली होती. मात्र पंडित नेहरू यांनी ही मागणी अमान्य केली. डॉ.मुखर्जी यांच्या मृत्युनंतर जनसंघाने या मुद्यासाठी अनेकदा देशव्यापी आंदोलन केले. ६ ऑगस्ट २०१९ रोजी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरसाठीचे ३७० वे कलम रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. डॉ.मुखर्जी यांनी ज्या मागणीसाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले, ती मागणी मोदी सरकारने पूर्ण केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत ३७० वे कलम रद्द करण्याबाबतचे विधेयक जेव्हा मांडले तेव्हा लाखो राष्ट्रप्रेमी कार्यकर्त्यांच्या भावना उचंबळून आल्या होत्या. डॉ.मुखर्जी यांचे हौतात्म्य वाया जाऊ देणार नाही, हा जनसंघाच्या कार्यकर्त्यांचा निर्धार अनेक वर्षांनी मोदी सरकारने प्रत्यक्षात आणला.

१९८७-१९८८ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या पालमपूर येथे झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात अयोध्येत राम मंदीर उभारणीची मागणी करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता. या मागणीसाठी आपल्या पक्षाने केलेला संघर्ष सर्व देशाने पाहिला आहे. अयोध्येत राम मंदीर उभारण्याची मागणी अनेक वर्षाच्या संघर्षानंतर पूर्ण झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रामल्लाच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा दिमाखात पार पाडला. आज रामनवमीच्या दिवशीच आपला वर्धापन दिनही आहे.

राजीव गांधी यांनी पंतप्रधान असताना मतपेढीच्या राजकारणासाठी शाहबानो खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल बदलण्यासाठी घटना दुरुस्ती केली. मुस्लिम धर्मियांच्या तुष्टीकरणासाठी राजीव गांधींनी हा निर्णय घेतला. मोदी सरकारने मुस्लिम महिलांची तिहेरी तलाकसारख्या अमानुष प्रथेतून सुटका करण्यासाठी ठाम निर्णय घेतला. तिहेरी तलाकची प्रथा अफगाणिस्तान, पाकिस्तान, तुर्की, मलेशिया, इंडोनेशिया यासारख्या मुस्लिम राष्ट्रांमध्येही अस्तित्वात नाही. भारतात मात्र अनेक वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसने ही प्रथा रद्द करण्याचे धाडस दाखवले नव्हते. मोदी सरकारने हे धाडस दाखवले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू आणि पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अली यांच्यात भारतातील मुस्लिमांचे आणि पाकिस्तानातील हिंदुंचे संरक्षण करण्याविषयी करार झाला होता. भारतात या कराराची सरकारकडून आणि समाजाकडूनही प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाली. मात्र पाकिस्तानातल्या





स्थापना दिनानिमित्त राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांनी लाजपत नगर मंडलच्या बूथ क्र. ७८ येथील ९८ वर्षीय दिल्लीच्या माजी महापौर शकुंतला आर्या यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांच्या निवासस्थानी ध्वजारोहण केले.



हिंदुंना तेथील सरकारकडून आणि समाजाकडूनही संरक्षण मिळाले नाही. सतत होणाऱ्या अत्याचाराला वैतागून अनेक हिंदू धर्मियांनी पाकिस्तान सोडून भारतात आश्रय घेतला. पाकिस्तानची निर्मिती झाली तेव्हा पाकिस्तानातील हिंदुंची लोकसंख्या २२ टक्के होती. आता ती अवघी १.८ टक्के एवढी उरली आहे. धार्मिक कारणांमुळे अत्याचार झालेल्या भारतात आश्रय घेतलेल्या शेजारी देशातील हिंदुंना भारताचे नागरिकत्व देण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला. सर्व मुस्लिम राष्ट्रांमध्ये वक्फ मंडळांचा कारभार तेथील सरकारकडून चालवला जातो. भारतात मात्र ती पद्धत नव्हती. मोदी सरकारने वक्फ मंडळांचा कारभार कायदे आणि नियमानुसार चालावा, यासाठी संबंधित कायद्यात दुरुस्ती केली. वक्फ मंडळांकडील संपत्तीचा वापर मुस्लिम समाजातील गरजूंच्या कल्याणासाठी व्हावा, या हेतूने वक्फ कायद्यात दुरुस्ती करण्यात आली आहे. मोदी सरकारच्या लोकोपयोगी कारभारामुळेच सामान्य जनतेचा भारतीय जनता पार्टीवरील विश्वास वाढू लागला आहे. त्यामुळेच जनतेने सलग तिसऱ्यांदा मोदी सरकारला निवडून दिले. १३ राज्यांमध्ये आपला पक्ष स्वत:च्या बळावर सत्तेत आहे. जनतेचा विश्वास आणखी वाढावा, यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सरकारची धोरणे, योजना जनतेपर्यंत पोहचवणे हे कार्यकर्त्यांचे काम आहे. त्याचबरोबर पक्षासाठी योगदान दिलेल्या, खस्ता खालेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी आपण नियमित संपर्क ठेवला पाहिजे. वर्धापन दिनाच्या पुन्हा एकदा शुभेच्छा देतो आणि थांबतो.

जय हिंद

# हा कार्यकर्त्यांचा पक्ष




● देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

> भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त राज्यभरातील कार्यकर्त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष व राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार आदी उपस्थित होते.

**अयोध्येत** रामलल्लाची प्रतिष्ठापना झाल्यानंतर राम नवमीच्या दिवशी पक्षाचा स्थापना दिवस साजरा व्हावा हा एक विलक्षण योगायोग नव्हे, तर एक प्रकारचा ईश्वरी संकेत असून ज्या रामराज्याच्या स्थापनेकरिता आपण सगळे प्रयत्नरत आहोत, त्या रामराज्याची आपली वाटचाल सुरू झाली असल्यानेच आज राम नवमीच्या निमित्ताने आपला स्थापना दिवस साजरा करत आहोत. महाराष्ट्रात पक्षाचे दीड कोटी सदस्य नोंदविण्याचा संकल्प आपण वेगाने पूर्ण केला असून या दीड कोटी सदस्यांमुळे जगाच्या पाठीवरील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून भाजपा स्थापित झाला आहे. दीड कोटी सदस्य नोंदणीचा टप्पा गाठल्याबद्दल मी महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. ही सदस्य नोंदणी अत्यंत शास्त्रीय पद्धतीने केलेली असल्यामुळे प्रामाणिक व पारदर्शक ठरली आहे,

भारतीय जनता पार्टीची वाटचाल तेजस्वी आहे, आपल्या सरकारच्या कारकिर्दीत सुरू असलेला विकासाचा आलेख उंचावता आहे, पण एवढ्यावरच न थांबता आणखी खूप काही आपल्याला करायचे आहे. सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडवून आणून परिवर्तनाचा पाया रचणारे एक गतिशील, पारदर्शी, प्रामाणिक सरकार देण्यासाठी आपले सरकार सातत्याने प्रयत्नशील असून शंभर दिवसांच्या कारभारातून आपण हा संदेश देऊ शकलो आहोत. महाराष्ट्राला सर्वोच्च स्थानी नेल्याखेरीज हे सरकार थांबणार नाही ही ग्वाही मी देतो, पण या गतिमान



वाटचालीत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जनता आणि सरकार यांमधील समन्वयाचा व संवादाचा सेतू होऊन काम केले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला असाच प्रचंड विजय मिळवायचा असून, भारतीय जनता पार्टी ही सामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याकरिता महाराष्ट्रात सातत्याने निवडून येत राहील, याकरिता आपला पाया मजबूत करून सामान्य माणसाचा विचारच मनात राहील असा संकल्प करू, आणि या महान पक्षाला अधिक महानता प्राप्त करून देण्यासाठी अधिकाधिक योगदान देण्याचा संकल्प स्थापना दिनानिमित्त सर्वांनी करू या.

१९५२ मध्ये जनसंघाच्या स्थापनेपासून 'राष्ट्र प्रथम' हा संस्कार मिळाल्याने संघ विचाराने प्रेरित असलेल्या आपल्या असंख्य कार्यकर्त्यांनी लोकशाही व संविधानाच्या संरक्षणाकरिता कित्येक महिने तुरुंगवास भोगला. पुढे लोकशाहीच्या रक्षणाकरिता आपले अस्तित्व जनता पक्षात विलीन केले, दुर्दैवाने कम्युनिस्ट व अन्य पक्षांच्या विचारसरणीमुळे जनता पक्ष फुटला व १९८० मध्ये आजच्या दिवशी जनसंघाचाच विचार घेऊन भारतीय जनता पार्टीच्या रूपाने आपण पुन्हा अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली संकल्पित होऊन राष्ट्रकार्यासाठी सिद्ध झालो. या वाटचालीत, श्यामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांच्यापासून नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत ४५ वर्षांच्या कार्यकाळातील ही वाटचाल विलक्षण आहे.

१९८० मध्ये मुंबईतच पक्षाच्या स्थापनेच्यावेळी अटलजींनी मावळत्या सूर्याच्या साक्षीने 'अंधेरा छटेगा, सूरज उगेगा, कमल खिलेगा' हे द्रष्टे विचार व्यक्त केले होते. त्यानंतर सातत्याने मेहनत करून आपण सत्तेपर्यंत पोहोचलो आहोत. आपला पक्ष ४५ वर्षांचा झाला आहे, आणि आता सातत्याने तीन वेळा देशाचे पंतप्रधान होण्याचा बहुमान मोदीजींना मिळाला ही आपली तेजस्वी वाटचाल आहे. आज देशाच्या १६ राज्यांत भाजपाचे सरकार आहे, तर २१ राज्यांत मित्रांसोबत आपला पक्ष सत्तेवर आहे. देशाच्या सर्व भागांत प्रमुख राजकीय पक्ष म्हणून भाजपा प्रस्थापित झाला आहे. या वाटचालीत भाजपाने लोकशाही सोडली नाही, घराणेशाही राबविली नाही. हा कार्यकर्त्यांचाच पक्ष राहिला, आमचा पक्ष कोणा परिवाराचा पक्ष नाही, तो मोठा असल्याने अध्यक्ष निवडीस योग्य वेळ लागणार, हे अमित शाह यांनी अखिलेश यादव यांना दिलेले उत्तर म्हणजे भाजपा व अन्य पक्षांतील नेमका फरक नोंदविणारे होते. महाराष्ट्रात प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, लक्ष्मणराव मानकर, सूर्यभान वहाडणे आदी अनेक नेत्यांच्या परिश्रमातून व संघर्षातून आज आपण महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष म्हणून सिद्ध झालो आहोत,

उद्धव ठाकरे यांनी बेईमानी केल्यामुळे एकदा सत्ता गमावली, पण हिंदुत्वाच्या मुद्द्यावर उद्धव सेनेचा त्याग करून सोबत आलेल्या एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करून आता तर आपण अभूतपूर्व यश संपादन केले असून भक्कम विजयानिशी कार्यकर्त्यांचे आशीर्वाद, मेहनतीमुळे आज राज्यातील सर्वात मोठ्या, शक्तिशाली सरकारचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी केंद्रीय नेतृत्वाबरोबरच पक्षाच्या असंख्य कार्यकर्त्यांचेही आभार मानतो. ■

# नव्या वक्फ कायद्यामुळे गोरगरीब मुस्लिमांना फायदा

● **अमित शाह**, केंद्रीय गृहमंत्री

> वक्फ दुरुस्ती विधेयक (२०२५) व मुस्लिम वक्फ रद्द विधेयक (२०२४) लोकसभेत मांडल्यानंतर या विषयावरील चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.



**या** विधेयकाच्या माध्यमातून केंद्र सरकार मुस्लिमांच्या धार्मिकबाबीत हस्तक्षेप करीत असल्याचा अपप्रचार काही विरोधी पक्षांनी केला. मुस्लिमांना भय दाखवून त्यांची मते मिळवण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांकडून सुरू आहे. वक्फ मंडळांचे कामकाज मुतवल्ली, वाकिफ या मुस्लिम व्यक्तींकडूनच पाहिले जाईल. मात्र वक्फ मंडळाद्वारे गोळा केल्या जाणाऱ्या देणग्यांचा, मालमत्तांचा वापर सर्वसामान्य मुस्लिमांच्या विकासासाठीच केला जात आहे ना, याकडे सरकारी यंत्रणा लक्ष ठेवणार आहेत. वक्फ मंडळातील धार्मिक बाबीसंदर्भात कोणत्याही कार्यात बिगर इस्लामिक व्यक्तीचा सहभाग असणार नाही. वक्फ मंडळांमध्ये ज्या बिगर मुस्लिम व्यक्ती असतील त्या मंडळांच्या कोणत्याही धार्मिक कामकाजांमध्ये सहभागी होऊ शकणार नाहीत. धर्मादाय आयुक्त पदावरील व्यक्ती कोणत्याही धर्माची असू शकते. या पदावरील व्यक्ती वक्फ मंडळाचे कामकाज धर्मादाय कायद्यानुसारच चालू आहे की नाही, याकडे बारकाईने लक्ष ठेवेल. मंडळांच्या प्रशासनावर लक्ष ठेवणे हे शासनाचे काम आहे, हे काम धर्माचे नाही. संपत्ती दान करण्याच्या संबंधातील व्यवहार शासकीय नियमानुसार होत आहेत ना, हे पाहणे प्रशासनाचे काम असते. वक्फच्या मालमत्ता विकून खाणाऱ्या मंडळींना पकडणे हे वक्फ मंडळांचे काम आहे. काही मंडळींनी वक्फच्या मालमत्ता कवडीमोल किमतीने १००-१०० वर्षांच्या मुदतीने भाडेपट्ट्यावर दिल्या आहेत. अशा मंडळींमुळे वक्फ मंडळांचे उत्पन्न वाढलेले नाही. वक्फच्या ताब्यातील एकूण मालमत्ता बघता वक्फ मंडळांचे उत्पन्न अत्यंत कमी आहे. वक्फच्या संपत्तीतून वक्फ मंडळांनी सर्वसामान्य मुस्लिम धर्मियांचा विकास करणे अपेक्षित होते, मात्र तसे झाले नाही. या पुढील काळात वक्फच्या मालमत्तांचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणाऱ्यांवर कारवाई करणे हेच वक्फ मंडळांचे प्रमुख काम असणार आहे. काही पक्ष सत्तेत असताना वक्फच्या व्यवस्थापनावर असणाऱ्या मूठभर मंडळींशी संगनमत करून अनेक गैरव्यवहार करण्यात आले. हे गैरप्रकार यापुढेही चालूच राहावेत, अशी काही विरोधी पक्षांची इच्छा होती. त्यामुळेच हे विरोधी पक्ष वक्फ कायद्यात दुरुस्ती करण्यास प्रखर विरोध करत होते. २०१४ च्या निवडणुकीपूर्वी २०१३ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने (यूपीए) वक्फ कायद्यात दुरुस्ती केली. या दुरुस्तीद्वारे वक्फ




कायद्याला भारतीय संविधानापेक्षा श्रेष्ठ बनवले गेले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मुस्लिम धर्मियांनी आपल्याला एकगठ्ठा मते द्यावीत या हेतूने दिल्लीतील ल्यूटियन्स भागातील १२३ मालमत्ता वक्फ मंडळांच्या नावे केल्या गेल्या.

हिमाचल प्रदेशात वक्फ बोर्डाची जमीन असल्याचे भासवून तेथे अनधिकृतपणे मशीद उभारण्यात आली. तामिळनाडूत दीड हजार वर्षे जुन्या तिरुचेंदूर मंदिराची ४०० एकर जमीन ही वक्फची संपत्ती असल्याचे जाहीर करण्यात आले. कर्नाटकातील एका समितीच्या अहवालानुसार, वक्फची २९ हजार एकर जमीन व्यावसायिक उपयोगाकरिता भाडेपट्ट्याने दिली गेली. सन २००१ ते २०१२ या काळात दोन लाख कोटी रुपये किमतीची वक्फची मालमत्ता खाजगी संस्थांना १०० वर्षांच्या भाडेपट्ट्याने बहाल करण्यात आली. बंगळुरूमध्ये न्यायालयाने हस्तक्षेप केल्यामुळे ६०२ एकर जमीनीचे हस्तांतर रोखले गेले, तर कर्नाटकातील विजयपूर येथील होनवाड या गावातील ५०० कोटी रुपये किमतीची १५०० एकर जमीन वादग्रस्त असल्याचे ठरवून केवळ १२ हजार रुपये मासिक भाडेतत्वावर पंचतारांकित हॉटेलकरिता देण्यात आली. शेकडो वर्षांपूर्वी कोणा मुस्लिम शासनकर्त्याने दान केलेली संपत्ती केवळ १२ हजार रुपये मासिक भाड्याने पंचतारांकित हॉटेलकरिता भाड्याने देणे योग्य आहे का?

हा सर्व पैसा मुस्लिम समाजाच्या कल्याणकारी योजनांसाठी असून धनदांडग्यांच्या तिजोऱ्या भरण्यासाठी नाही. गरीब मुसलमान, घटस्फोटित महिला, अनाथ मुले, बेरोजगार युवक आणि गरजूंच्या कल्याणासाठी आणि त्यांना प्रशिक्षित करणारे उपक्रम राबविण्यासाठी वक्फ बोर्डाच्या संपत्तीचा विनियोग व्हायलाच हवा. वक्फ बोर्डाकडे लाखो कोटींची जमीन आहे, मात्र जेमतेम १२६ कोटी रुपयांचे उत्पन्न आहे.

केवळ मतांच्या राजकारणाकरिता नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार कोणतेही कायदे करत नाही, कारण न्याय आणि जनतेच्या कल्याणाच्या हेतूनेच कायदे बनविले जातात. याच सभागृहाने महिलांकरिता ३३ टक्के आरक्षणाचा कायदा आणला, आणि उपेक्षितांना संविधानिक अधिकारही दिले. प्रत्येकाला त्याच्या धर्मानुसार आचरण करण्याचा पूर्ण हक्क आहे, पण लोभ, मोह आणि भीती दाखवून बदल घडविता येत नाही. वक्फ सुधारणा विधेयक हा देशाच्या संसदेने बनविलेला कायदा आहे, आणि तो बंधनकारक असल्याने सर्वांना स्वीकारावा लागेल. या




कायद्यामुळे वक्फच्या जमिनी सुरक्षित राहतील. कोणा एखाद्याच्या केवळ घोषणेमुळे कोणतीही जमीन वक्फची होणार नाही, तसेच सामान्य नागरिकांच्या जमिनींनादेखील संरक्षण मिळेल. कोणत्याही जमिनीवर वक्फची मालकी जाहीर करण्याचा अधिकार संपुष्टात आणला जाणार असून आता जिल्हाधिकाऱ्यांकडून त्याची सत्यता पडताळून पाहिली जाईल, त्याचबरोबर, नव्या वक्फची पारदर्शक पद्धतीने नोंदणीदेखील करावी लागेल. अल्पसंख्यांक समुदायाच्या मनात भयाची भावना पेरणे ही एक फॅशन झाली आहे. राम जन्मभूमी, तिहेरी तलाक, नागरीकत्व सुधारणा विधेयकाबाबत हेच केले गेले, पण यात भीती बाळगण्यासारखे काहीच नव्हते हे मुस्लिम समाज जाणतो. मोदी सरकारच्या कार्यकाळात देशातील कोणत्याही धर्माच्या नागरिकांना भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही, आणि त्याच्या धार्मिक आचरणात कोणतीही बाधा येणार नाही.

२०१३ मध्ये डॉ.मनमोहन सिंग सरकारने वक्फ कायद्यात दुरुस्ती करणारे विधेयक मांडले होते, त्यावेळी सत्तारूढ पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्यानी वक्फच्या मालमत्तांची होणार लूट थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची मागणी केली होती. वक्फच्या मालमत्तांच्या गैरवापर करणाऱ्यांना तुरुंगात धाडले पाहिजे, अशी मागणीही या नेत्याने केली होती. मात्र मनमोहन सिंग सरकारने वक्फच्या मालमत्तांचा गैरवापर रोखण्यासाठी धाडसी निर्णय घेणे टाळले. आता वक्फ कायद्यात दुरुस्ती होणार असल्याने वक्फ मंडळाच्या हिशोबाचे अत्यंत पारदर्शक पद्धतीने लेखापरिक्षण (ऑडिट) होईल. आधीच्या कायद्यानुसार वक्फच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येत नव्हते. आता या विधेयकामुळे वक्फच्या निर्णयांना न्यायालयात आव्हान देता येईल. देशात एखाद्या मंदिरासाठी जमीन खरेदी करायची असेल तर त्या जमिनीचा मालकी कोणाकडे आहे. याचा निर्णय जिल्हाधिकारी करतो. असे असताना वक्फच्या जमिनीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात काहीच चुकीचे नाही. वक्फची जमीन सरकारी आहे किंवा नाही, याबाबतचा निर्णय जिल्हाधिकारीच कागदपत्रांची पडताळणी करून घेऊ शकतो.

२०१३ मध्ये मनमोहन सिंग सरकारने आणलेल्या वक्फ दुरुस्ती विधेयकावर संसदेच्या दोन्ही सभागृहात मिळून साडेपाच तास चर्चा झाली होती. यावेळच्या विधेयकावर दोन्ही सभागृहात मिळून १६ तासांपेक्षा अधिक तास चर्चा झाली. या विधेयकांबाबत विरोधी पक्षीयांचे तसेच अन्य संबंधित घटकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी मोदी सरकारने संयुक्त संसदीय समितीची स्थापना केली होती. या समितीच्या ३८ बैठका झाल्या. या बैठकांमध्ये १३ तास चर्चा झाली होती. संपूर्ण देशभरातून १ कोटीहून अधिक सूचना ऑनलाईन पद्धतीने आल्या. या सर्वांचे मत विचारात घेऊनच हे विधेयक तयार करण्यात आले आहे.

१९१३ पासून २०१३ पर्यंत म्हणजे १०० वर्षांच्या काळात वक्फ मंडळांकडे १८ लाख एकर जमिन होती. २०१३ ते २०२५ या १२ वर्षांच्या काळात वक्फ मंडळांकडील जमिन २१ लाख एकरापेक्षा अधिक झाली. वक्फ मंडळांनी भाडेपट्ट्यांनी दिलेल्या मालमत्तांची संख्या २० हजार एवढी होती. मात्र अलिकडेच झालेल्या ऑडिटनंतर ही संख्या शून्यावर आली आहे. या मालमत्ता विकून टाकण्यात आल्या आहेत, असे पाहणीत दिसून आले आहे. वक्फ मंडळ ज्या जमिनीवर हक्क सांगेल ती जमिन वक्फ मंडळाच्या नावाने करण्याची तरतूद पूर्वीच्या कायद्यामध्ये होती. आता ही तरतूद काढून टाकण्यात आली आहे. नव्या विधेयकानुसार एखादी मालमत्ता वक्फ आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असणार आहे. ■

# नगण्य ते क्रमांक एक



● **माधव भांडारी**, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

> भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेला नुकतीच ४५ वर्षे पूर्ण झाली. अत्यंत खडतर आणि संघर्षमय असा हा ४५ वर्षांचा प्रवास आहे. ४५ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्षाच्या वाटचालीचा घेतलेला आढावा.

**पक्षाची** स्थापना झाली त्या वर्षी किंवा नंतर चार वर्षांनी झालेल्या निवडणुकीत पक्षाने मिळवलेली मते आणि जिंकलेल्या जागा विचारात घेता हा पक्ष भारताच्या राजकारणात नजिकच्या काळात क्रमांक एकचा पक्ष ठरेल, भारताच्या राजकारणाचा एक ध्रूव ठरेल असे कोणालाही, अगदी पक्षाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना सुद्धा वाटले नव्हते. घोषणा देणाऱ्या उत्साही कार्यकर्त्यांना मंचावरून 'ये अगली बारी, अगली बारी बंद करो, ऐसा कुछ होता नही हैं' अशा शब्दात तंबी देऊन नेत्याने गप्प केल्याची घटना सुद्धा घडली होती. बहुसंख्य राजकीय विश्लेषकांनी ह्या पक्षाला काही भवितव्य नसल्याची भाकिते वर्षानुवर्षे केली होती. त्यापैकी बहुतेकांची ती आंतरिक इच्छा होती. पण त्यांची सगळी भाकिते खोटी ठरवून तोच पक्ष आजघडीला ह्या देशाच्या राजकारणाचा एकमात्र केंद्र बिंदू बनला आहे.


जनता पार्टीमधून बाहेर पडून ६ एप्रिल १९८० रोजी पक्षाची स्थापना झाली तेव्हा लोकसभेच्या निवडणुका नुकत्याच होऊन गेल्या होत्या. अवघ्या दोन वर्षांपूर्वी २९५ जागा जिंकून इतिहास घडवणारी जनता पार्टी त्या निवडणुकीत केवळ ३१ जागा जिंकू शकली होती. त्यापैकी एकोणीस लोकसभा सदस्य भाजपामध्ये सामील झाले होते. त्यामध्ये पूर्वाश्रमीचे जनसंघाचे बहुतेक सदस्य तर होतेच शिवाय सिकंदर बख्त, शांतिभूषण, राम जेठमलानी यांच्यासारखे बिगर जनसंघी सुद्धा होते. पण १९८४ साली




झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्यापैकी कोणीही निवडून येऊ शकले नाहीत. अटलबिहारी वाजपेयींसह सर्व शीर्षस्थ नेते पराभूत झाले होते. सगळ्या देशाला अपरिचित असलेले केवळ दोन सदस्य निवडून आले. पक्षाच्या इतिहासातला तो सर्वात अवघड काळखंड होता.

महाराष्ट्रात तर परिस्थिती अधिक अवघड होती. महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने त्या काळातला काँग्रेसचा बालेकिल्ला होता. १९७२ साली जनसंघाचे केवळ पाच सदस्य महाराष्ट्र विधानसभेत निवडून गेले होते. तर १९७८ साली झालेल्या निवडणुकीत जनता पार्टीला फक्त ९९ जागा जिंकता आल्या होत्या, त्यात साधारणपणे ३० जण पूर्वाश्रमीच्या जनसंघाशी नाते सांगणारे होते. १९८० साली भाजपाची स्थापना करताना जनता पार्टीच्या आमदारांपैकी ३४ जण भाजपात सामील झाले. त्याच वर्षी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या. 'भारतीय जनता पार्टी' हे नाव आणि 'कमळ' हे नवे चिन्ह घेऊन लढवलेली ही देशातली पहिली निवडणूक! त्या निवडणुकीत आमच्या पदरात फक्त १४ जागा आणि ९.४% मते पडली होती. त्यावेळेला पक्षाचे नाव व निशाणी लोकांपर्यंत घेऊन जाण्याच्या उद्देशाने आम्ही जास्तीत जास्त जागा लढवण्याचा प्रयत्न सर्व ताकत लावून केला होता. त्यानंतर सुद्धा आम्ही केवळ १४५ उमेदवारच उभे करू शकलो होतो. जवळ जवळ पंधरा वर्षे आमची ही परिस्थिती कायम होती. १९९० मध्ये पहिल्यांदा आम्ही ४२ जागांवर पोचलो पण मतांचा वाटा मात्र ११% च्या खालीच होता. त्याच काळात आम्ही शिवसेनेबरोबर युती केली आणि ती तीस वर्षे चालवली. युतीमुळे आम्ही एकदा सत्तेत आलो हे जरी खरे असले तरी पक्षाच्या वाढीला युतीमुळे स्वाभाविक मर्यादा पडल्या होत्या. त्या युतीमुळे विधानसभेच्या केवळ ४०% व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्याही पेक्षा कमी साधारण ३०% जागा आमच्या वाट्याला येत असत. पक्ष स्थापन झाल्यानंतर ३४ वर्षांनी पहिल्यांदा २०१४ साली आम्ही महाराष्ट्रात विधानसभेच्या सर्वाधिक म्हणजे २६१ जागा स्वबळावर लढवल्या. त्या निवडणुकीत २८% मते मिळवून व १२२ जागा जिंकून आम्ही पहिल्या क्रमांकावर आलो. २०१९ च्या निवडणुकीत शिवसेनेबरोबर पुन्हा युती केल्यामुळे आम्ही फक्त १६४ जागा लढवल्या व त्यातल्या १०५ जिंकल्या. आम्ही आमचा पहिला क्रमांक टिकवला हे खरे असले तरी युती करून आम्ही मतांची टक्केवारी आणि जागा गमावल्या हे वास्तव होते. पण ह्याच काळात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आमचा पाया मोठ्या प्रमाणात विस्तारण्यात आम्ही यश मिळवले. लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था ह्या सर्व स्तरावर आज आम्ही पहिल्या क्रमांकावर आहोत.

अर्थात हे दिवस सहजासहजी आलेले नाहीत. सर्वोच्च नेत्यापासून तळागाळातल्या सामान्य कार्यकर्त्यापर्यंत



**जनसंघाच्या स्थापनेवेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ९ प्रचारकांना जनसंघाच्या कामाची जबाबदारी देण्यात आली. त्यापैकी जगदीश प्रसाद माथुर, नानाजी देशमुख, जगन्नाथराव जोशी, बलराज मधोक, पं. दीनदयाल उपाध्याय, अटल बिहारी वाजपयी, केदारनाथ सहानी, पं. यज्ञदत्त शर्मा, सुंदरसिंह भंडारी. या ९ जणांना जनसंघाची 'नवरत्ने' असे म्हटले जात असे. या ९ जणांनी अत्यंत प्रतिकूल स्थितीत जनसंघाचा पाया मजबूत केला.**

सत्ताधारी शक्तींनी केला होता. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांपासून खेड्यापाड्यातले लहान लहान कार्यकर्ते सुद्धा त्यापायी हत्येचे, हिंसाचाराचे लक्ष्य बनले. पण तरीसुद्धा जनतेपर्यंत पोचण्याचे, त्यांच्याशी स्वतःला जोडून घेण्याचे प्रयत्न आम्ही कधी सोडले नाहीत. वारंवार झालेल्या पराभवामुळे आम्ही कधी खचून गेलो नाही. क्षणिक निराशा आली तरी ती झटकून टाकून पुन्हा जनतेकडे जाण्यात आम्ही कधी टाळाटाळ केली नाही. 'आम्हाला मते न देणारी जनता मूर्ख आहे' ही भावना कधीच आमच्या मनाला शिवली नाही. पराभव झाल्यानंतर त्याची कारणे शोधून काढून ती दूर करण्यावर आम्ही भर दिला. १९८४ च्या ऐतिहासिक पराभवाची कारणे शोधण्यासाठी ज्येष्ठ नेते सर्वांचे कमालीचे कष्ट त्यामागे आहेत. जनसंघाच्या उभारणीसाठी त्याकाळात जे परिश्रम सर्वांनी घेतले आहेत त्याची कल्पना सुद्धा आज कोणी करू शकणार नाही. माणसांपासून साधनांपर्यंत प्रत्येक गोष्टीचा अभाव एवढी एकच निश्चिती होती. तरीही आपले विचार लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी करावे लागणारे सर्व प्रकारचे कष्ट प्रत्येकजण करत होता. आज लोकांना कल्पनासुद्धा करता येणार नाही पण १९७२ सालापूर्वी अटलजींनी आणि दीनदयाळजींनी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात किमान एक तरी दौरा केला होता. तसेच दौरे त्यांनी १९८० ते ८३ या काळात केले होते. उत्तमराव पाटील गेले नव्हते असा एकही तालुका महाराष्ट्रात नव्हता. त्याखेरीज नेत्यांची एक फौज होती ज्यांनी महाराष्ट्र उभा आडवा पिंजून काढला होता. त्या सर्वांची नुसती नावे देण्यासाठी स्वतंत्र लेख लिहावा लागेल. त्या सर्वांनी ज्या अडचणींना तोंड देऊन पक्ष वाढवला त्यांचीही कल्पना आज कोणी करू शकणार नाही. आम्हाला टिकू न देण्याचा निर्धार त्या काळातल्या

कै. सुंदरसिंग भंडारी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने एक समिती नेमली होती. त्या समितीने प्रत्येक जिल्ह्यात जाऊन कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून आपला अहवाल दिला होता. त्या अहवालानुसार आपली धोरणे, कार्यपद्धती या सर्व बाबतीत पक्षाने अनेक बदल केले. बेचाळीस वर्षांच्या ह्या वाटचालीत भारतीय जनता पार्टीने अनेक चढउतार पाहिले आहेत, टक्केटोणपे खाल्ले आहेत, धक्के सहन केले आहेत. याच बेचाळीस वर्षांमध्ये दोन लोकसभा सदस्यांपासून सुरुवात करून ३०३ सदस्यांपर्यंत आम्ही पोचलो होतो. सतरा राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये आज आम्ही सत्तेवर आहोत.

देशातील ४०% स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आम्ही प्रभावी आहोत. आज जनता आम्हाला प्रतिसाद देते आहे, हा प्रतिसाद टिकवायचा असेल तर जनतेच्या अपेक्षा जाणून घेऊन त्या पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत रहाणे आवश्यक आहे याची जाणीव आम्हाला आहे, हीच आमची जनतेबरोबरची बांधिलकी आहे. ■

# कार्यकर्त्याच्या क्षमता विकासाची व्यवस्था करणारा पक्ष



● रवींद्र साठे

> पार्टी संघटन वाढते ते कार्यकर्त्यांच्या भरवशावरच, त्यामुळे कार्यकर्त्यांची योग्य ती जडणघडण झाली पाहिजे, त्याचा व्यक्तीमत्व विकास झाला पाहिजे, यासाठी त्यास प्रशिक्षित होणे गरजेचे आहे, ही भाजपाची सुरुवातीपासूनची भूमिका राहिली आहे.


**भारतीय** राजकारणात भाजपा आणि साम्यवादी पक्ष वगळता अन्य राजकीय पक्षांमध्ये प्रशिक्षणाची स्वतंत्र अशी रचना नाही. पूर्वीचा जनसंघ व नंतरच्या भाजपाने प्रारंभापासूनच 'कार्यकर्ता' या संकल्पनेला महत्त्व दिले आहे, कारण भाजपाच्या दृष्टीने 'कार्यकर्ता' हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पार्टी संघटन वाढते ते कार्यकर्त्यांच्या भरवशावरच, त्यामुळे पार्टीत येणाऱ्या कार्यकर्त्यांची योग्य ती जडणघडण झाली पाहिजे, त्याचा विकास झाला पाहिजे, यासाठी त्यास प्रशिक्षित होणे गरजेचे आहे, ही भाजपाची सुरुवातीपासूनची भूमिका राहिली आहे. पार्टीची आज झालेली संघटनात्मक वाढ व क्षमता संवर्धनाचा मार्ग याचे श्रेय द्यायचे झाले तर पार्टीच्या प्रशिक्षणाच्या रचनेस द्यावे लागेल.

भारतीय राजकारणात विशेषत: १९९० नंतर भाजपाची राष्ट्रीय स्तरावर व अनेक राज्यांमध्ये जसजशी ताकद वाढू लागली तसतशी प्रशिक्षणाची आवश्यकता अधिक भासू लागली. आधुनिक व्यवस्थापनशास्त्राच्या प्रचलित सिद्धांताप्रमाणे, आजच्या काळात प्रशिक्षण म्हणजे केवळ प्रशिक्षण कक्षात बसवून विषय शिकवणे नव्हे, तर कार्यकर्त्यांचा सहभाग, आंतरक्रिया, अनुभवांची देवाण-घेवाण यांच्या माध्यमातून त्यांची मानसिक व बौद्धिक क्षमता उंचावण्यास मदत करणे. त्यामुळे राजकारणात

मिळणाऱ्या व येणाऱ्या संधीचे सार्थक होण्यासाठी कार्यकर्त्यांची गुणवत्ता व क्षमतावाढीसाठी त्यांचे प्रशिक्षण घडवून आणणे, हा भाजपाचा सुरुवातीपासूनचा एक अजेंडा राहिला आहे. त्यामुळे पार्टीने प्रशिक्षणाची एक शिस्तबद्ध व नियोजनबद्ध रचना उभी केली आहे. स्वत:चे प्रशिक्षणाचे एक धोरण ठरविले आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून भाजपाने पार्टी विथ ए डिफरन्स ही एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. हा राजकीय सक्रियतेस गुणवत्ता देण्याचा प्रयत्न आहे.

भाजपाची प्रशिक्षणाची एक स्वतःची रचना आहे. राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण विषयाचा विचार करण्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण प्रकोष्ठ आहे. या प्रकोष्ठाच्या वतीने पार्टीत वेळोवेळी होणाऱ्या प्रशिक्षणाची आखणी होत असते. प्रत्येक राज्यासाठी प्रशिक्षण प्रमुख नियुक्त झाले आहेत. राज्य स्तरावर प्रशिक्षणाचा विचार करण्यासाठी प्रशिक्षण समिती नियुक्त झाली आहे. संघटनेच्या दृष्टीने मंडल, जिल्हा, राज्य व काही विषयांसाठी राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण वर्ग योजले जातात. भाजपाचे जे लोकप्रतिनिधी आहेत त्यांच्यासाठीही प्रशिक्षणाची रचना केली जाते. यांत ग्रामपंचायत जिल्हा परिषद, महापालिका सदस्य, आमदार–खासदारांपासून सरकारांमधील मंत्र्यापर्यंत नियमितपणे प्रशिक्षण वर्ग योजण्यात येतात. लोकप्रतिनिधी निवडून येतो तेव्हा त्यास त्याची कर्तव्ये व जबाबदारी काय हे माहीत नसते, तो सभागृहात जातो तेव्हा त्यास संसदीय कामाची माहिती नसते. सभागृहात उभे राहिल्यावर प्रश्न कसे विचारावेत, संसदीय आयुधांचा उपयोग कसा करावा याचे अल्प ज्ञान असते. या पार्श्वभूमीवर पार्टीच्या वतीने लोकप्रतिनिधी जेव्हा प्रथमच निवडून येतो त्यानंतर त्यांचे प्रशिक्षण वर्ग योजले जातात. लोकप्रतिनिधीला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून दिली तर तो अधिक प्रभावी काम करू शकतो. त्यामुळे त्यांच्यासाठीच्या प्रशिक्षणात काही कायदेशीर बाबी (उदा ग्रामपंचायत कायदा, महापालिका कायदा, भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वे), ग्रामपंचायत, महापालिका किंवा विधिमंडळ कामकाज, आर्थिक अंदाजपत्रक इ. सारखे काही तांत्रिक विषय तसेच मतदारसंघाची जोपासना, सरकारी योजना व लोकसहभाग यांसारख्या व्यावहारिक विषयांचे प्रशिक्षण दिले जाते.

भाजप 'प्रशिक्षण' या विषयाकडे गांभीर्याने बघतो.



कार्यकर्ता वा लोकप्रतिनिधींचे एकदा प्रशिक्षण झाले की तो व ती सर्वार्थाने प्रशिक्षित झाले अशी पार्टीची भूमिका नसते, तर पार्टी असे मानते की, प्रशिक्षण ही एक निरंतर प्रक्रिया आहे आणि त्यामुळे प्रशिक्षणाच्या रचनेतून प्रतिवर्षी सर्व कार्यकर्त्यांना जावे लागते. भाजपा एक सर्वात मोठे राजकीय संघटन आहे. त्याची ताकद आहे ती बूथ स्तरावर काम करणारा कार्यकर्ता. एक बूथ आणि ५० युथ (युवक) ही भाजपाची घोषणा आहे. त्यामुळे बूथ स्तरावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मेळावे व प्रशिक्षण पार्टी घडवून आणते. कोणत्याही प्रकारची निवडणूक आली की, निवडणुकीसाठी सर्व स्तरावरील कार्यकर्त्यांनी कसे सिद्ध राहिले पाहिजे यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण होत असते. यात निवडणूक व्यवस्थापन, प्रचारतंत्र, सोशल मीडिया, वातावरणनिर्मिती, मतदार संपर्क आदी विषयाचा समावेश असतो.

कोणत्याही प्रकारची निवडणूक आली की, सर्व राजकीय पक्ष छोट्या–छोट्या स्तरांवर प्रशिक्षण योजताना दिसतात, परंतु भाजपाचे वैशिष्ट्य असे की, निवडणुकीच्या व्यतिरिक्त पार्टीच्या वतीने सर्व स्तरांवरील कार्यकर्त्यांचे नियमित प्रशिक्षण होत असते. यांत विविध मोर्चे म्हणजे महिला मोर्चा, युवा मोर्चा, अनुसूचित जाती मोर्चा, पार्टी प्रवक्ते, किसान मोर्चा, जनजाती मोर्चा पार्टीच्या राज्य कार्यालयांचे प्रमुख इ. पार्टीच्या संघटनात्मक रचनेत जेवढे घटक आहेत त्या सर्वांचे सातत्याने प्रशिक्षण होत असते. प्रत्येक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम, दिनक्रम, वक्ते, सत्रांची रचना, वेळ अनुशासन इ. गोष्टींचे प्रामुख्याने पालन होते.



प्रशिक्षणाची वेगवेगळी मोड्यूल्स ठरविली आहेत. काही घटकांचे गरजेनुसार प्रशिक्षण होते. प्रशिक्षणास जो अपेक्षित आहे त्याची सूची केली जाते. त्याच्या निवडीचे निकष ठरविले जातात. कार्यक्रमाचे स्थान ठरविले जाते. सामान्यपणे प्रशिक्षण वर्ग हे निवासी असतात. सर्व स्तरांवरील कार्यकर्ते व नेते एकत्र राहतात. वर्गात पूर्णपणे अनुशासन पाळले जाते. कार्यकर्त्यांनी प्रशिक्षणातून संस्कार, प्रेरणा व उत्साह घेऊन जावे असा प्रयत्न असतो. त्यामुळे त्यास पोषक असे वातावरण, व्यवस्था निर्माण केल्या जातात. निवास भोजन, मंच व्यवस्थापन, संचालन, सभागृह आदी व्यवस्थांकडे काटेकोरपणे लक्ष दिले जाते.

प्रशिक्षण वर्गात काही सैद्धांतिक विषय, संघटनात्मक व काही माहितीसाठीचे व व्यवस्थापनशास्त्राशी संबंधित विषयांची रचना असते. पार्टीची वैचारिक भूमिका, इतिहास व त्याची वाटचाल संघटनात्मक रचना, कार्यपद्धती, संघटनात्मक उपक्रम, संघटन व सरकार यातील समन्वय, कार्यकर्ता व्यवहार, कार्यालय व्यवस्थापन, इत्यादी विषयांचा समावेश असतो. या व्यतिरिक्त कार्यकर्ता ज्या स्तरावरचा आहे त्याप्रमाणे त्याच्याकडूनच्या अपेक्षा, जबाबदाऱ्या इ.ची चर्चा होते. या प्रशिक्षणात पंतप्रधान नरेंद्र मोदी, पार्टी अध्यक्ष जे.पी.नड्डा, गृहमंत्री अमित शाह यांच्यासारख्या शीर्षस्थ नेत्यांपासून ते बूथ स्तरावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यापर्यंत सर्व जण सहभागी होतात. स्व. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण आडवाणी, विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपाशासित राज्याच्या मुख्यमंत्र्यापासून सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सर्वजण या प्रशिक्षण उपक्रमांमधून सहभागी झाले आहेत. प्रशिक्षण वर्ग झाल्यानंतर वर्गाचे सिंहावलोकन–व्यवस्था व विषयांचा आढावा घेतला जातो. सहभागींकडूनही अभिप्राय घेतला जातो. या प्रशिक्षणातून भाजपाने स्वतःची एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैली विकसित केली आहे. राजकीय कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण म्हटले की, एक तर लोकांना त्याचे आश्चर्य वाटते व कुतूहलही वाटते. भाजपाकडे स्वत:ची रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीसारखी एक प्रशिक्षण संस्था उभी राहिली आहे. संपूर्ण दक्षिण आशियात राजकीय कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणारी एकमात्र स्वतंत्र प्रशिक्षण अकादमी म्हणून काम करत आहे. कार्यकर्ते प्रशिक्षणाच्या यज्ञात सहभागी होतात. त्यानंतर त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट होण्यास मदत होते, दृष्टिकोन व्यापक होतो. ते सर्व जण काम अधिक समजून घेऊन करतात. जाणिवा प्रगल्भ होतात. सामाजिक प्रश्नांबद्दलची जाणीव, संवेदना निर्माण होते. त्यांच्यातील नेतृत्वगुणांना वाव मिळतो, त्यांचा आत्मविश्वास वाढतो असा पार्टीचा अनुभव आहे.

प्रशिक्षण हा भाजपाचा स्थायिभाव आहे. कार्यकर्ता मुशीतून घडतो तसे प्रशिक्षणाच्या यज्ञातून गेलेले कार्यकर्ते समाजात प्रभावीपणे काम करू शकतात. पार्टीची सदस्यसंख्या केवळ वाढून चालणार नाही, तर पार्टीची संख्यात्मक व गुणात्मक वाढ झाली पाहिजे म्हणूनच प्रशिक्षणाचा आग्रह पार्टीत धरला जातो. त्यांना खऱ्या अर्थाने सामाजिक प्रश्नांची, राजकारणातील आव्हानांची, देशातील समस्यांची खरी जाण निर्माण होते. तो विकसित होतो, प्रगल्भ होतो. स्वत:चा विकास म्हणजेच पार्टीचा विकास आणि राजकीय पक्ष विकसित होतो म्हणजे मूल्याधिष्ठित राजकारण निर्माण होऊन लोकशाही बळकट होण्यास साहाय्यभूत होते.

**(श्री. साठे हे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे महासंचालक व राज्य खादी ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष आहेत.)**

# आणखी एक संकल्पपूर्ती



मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेला दहशतवादी हल्ला ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील भळभळती जखम आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी. अशा महानगरावर मूठभर अतिरेक्यांनी हल्ला चढवून या शहराला ५-६ दिवस अक्षरश: वेठीस धरले होते.

**केंद्र** सरकार आणि राज्य सरकारच्या पोलीस आणि सुरक्षा, गुप्तचर विषयक यंत्रणा या मूठभर अतिरेक्यांपुढे हतबल झाल्या होत्या. या हल्ल्याची पूर्वसूचना आपल्या गुप्तचर यंत्रणांना मिळूनही हा हल्ला रोखण्यासाठी या यंत्रणांनी आवश्यक त्या उपाययोजना का केल्या नाहीत, या अतिरेक्यांना ताज हॉटेलमधून हुसकावून लावण्यासाठी देशाच्या सुरक्षायंत्रणा तातडीने कार्यरत का होऊ शकल्या नाहीत. सुरक्षायंत्रणा, गुप्तचर खाते, पोलीस विभाग यांच्या आवश्यक समन्वय का नव्हता, अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरातून त्यावेळच्या केंद्रातील आणि राज्यातील काँग्रेस सरकारचे नाकर्तेपण पुढे आले. या हल्ल्याने भारताची संपूर्ण जगात नाचक्की झाली. या हल्ल्यात मोठा सहभाग असलेल्या तहव्वुर राणा या ६४ वर्षीय पाकिस्तानी वंशाच्या कॅनेडीयन नागरिकाला नुकतेच भारतात आणण्यात आले. तहव्वुर राणाला अमेरिकेच्या ताब्यातून भारतात आणण्यासाठी मोदी सरकारने गेल्या १० वर्षात राजनैतिक पातळीवर अव्याहत प्रयत्न केले. या प्रयत्नांना राणाच्या प्रत्यार्पणाने अखेर यश आले आहे. मोदी सरकारच्या मुत्सद्देगिरीचा हा मोठा विजय आहे. राणाची अटक ही अमेरिकेतील दीर्घ कायदेशीर लढाईमुळे शक्य होऊ शकली. प्रत्यार्पण टाळण्यासाठी राणाने अमेरिकेतील विविध न्यायालयांमध्ये अपील केले होते. भारताने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयातही सर्व कायदेशीर मार्गांचा आधार घेत बाजू मांडल्यामुळे भारताच्या बाजूने अमेरिकेच्या न्यायालयाने निकाल दिला. मोदी सरकारने केलेल्या अनेक संकल्पांपैकी एकाची पूर्ती राणाच्या अटकेने झाली आहे.

२००४-२०१४ या काळात मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे सरकार सत्तेत असताना





पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी संपूर्ण देशभरात थैमान घातले होते. बॉम्बस्फोट नित्याचे झाले होते. केंद्राची सुरक्षायंत्रणा दहशतवाद्यांना रोखण्यात साफ अपयशी ठरली होती. पाकिस्तानी दहशतवाद्यांनी मन मानेल तेव्हा कोठेही बॉम्बस्फोट घडवून आणावेत आणि मनमोहन सिंग सरकारने त्याकडे असहाय्यतेने पाहत राहावे, असे चित्र २००४ ते २०१४ या १० वर्षात अनेकदा दिसले. याचा कळस २६ नोव्हेंबर २००८ रोजी चढला गेला. २०१४ नंतर मोदी सरकारने देशाची अंतर्गत सुरक्षा आणि गुप्तचर यंत्रणा कार्यक्षम बनवून पाकिस्तानी दहशतवाद्यांचे दहशतवादी हल्ल्याचे अनेक प्रयत्न उधळून लावले. अतिरेक्यांनी केलेल्या दोन हल्ल्यांना सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकच्या रूपाने खणखणीत उत्तर दिले गेले. बलशाली देश कसा असतो याची प्रचिती मोदी सरकारने जगाला आणून दिली. आता भारतात घुसून बॉम्बस्फोट करणे, हल्ले करणे पाकिस्तानी दहशतवाद्यांना अशक्य झाले आहे. एकीकडे अंतर्गत सुरक्षा बळकट करून आणि गुप्तचर यंत्रणा कार्यक्षम करून मोदी सरकारने अतिरेक्यांचे अनेक संभाव्य हल्ल्यांचे प्रयत्न उधळून लावले. त्याचबरोबर मुंबई हल्ल्याला जबाबदार असलेल्या तहव्वुर राणाचा भारताला ताबा कसा मिळेल, यासाठी मोदी सरकारने आपली कुटनिती पणाला लावली होती. भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७ मध्ये गुन्हेगारांचे प्रत्यार्पण करण्यासाठी करार झाला. या करारानुसारच राणाला भारताच्या स्वाधीन करणे अमेरिकेला भाग पडले आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले होते. या आरोपपत्रात पोलिसांनी तहव्वुर राणा हा मुंबईवरील हल्ल्याचा सूत्रधार होता, असे नमूद करण्यात आले आहे. ४१५ पानांच्या या आरोपपत्रात तहव्वुर राणा आणि डेव्हिड हेडली या दोघांनी मुंबईत पाकिस्तानी अतिरेकी घुसवून वेगवेगळ्या ठिकाणी कसे हल्ले चढवले याचा तपशीलवार उल्लेख आहे. अजमल कसाब आणि अन्य अतिरेक्यांनी मुंबईवर केलेल्या हल्ल्यात ६ अमेरिकन नागरिकांसह १६६ भारतीयांचा मृत्यू झाला. या हल्ल्यातील सहभाग स्पष्ट झाल्यानंतर भारताने अमेरिकेकडे १० जून २०२० रोजी राणाच्या अटकेची अधिकृत मागणी केली होती. एखाद्या अमेरिकन नागरिकाला अमेरिकन न्यायालयाने भारताकडे सुपुर्द करण्याची घटना स्वतंत्र भारताच्या इतिहासाच प्रथम घडली आहे. राणाला आता 'एनआयए'च्या कोठडीत ठेवण्यात आले आहे. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यामागील अनेक देशी-विदेशी शक्तींचा असलेला सहभाग राणा उघड करू शकतो. तसे झाले तर मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या मागे असणारे अनेक दृश्य-अदृश्य हात बेनकाब होणार आहेत. डिसेंबर २०२४ पर्यंत भारताने ४८ राष्ट्रांबरोबर प्रत्यार्पण करार केले आहेत. देशातील दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या १७८ देशांना प्रत्यार्पणासाठी विनंती करण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. राणा याला प्रत्यार्पणाद्वारे भारतात आणण्याच्या कामी ज्येष्ठ वकील दयान कृष्णन् यांनी मोठे योगदान दिले.

राणाच्या अटकेनंतर आपल्या सख्ख्या शेजाऱ्यांनी म्हणजे पाकिस्तानने तहव्वुर राणाशी आपलाच कसलाच संबंध नसल्याचे म्हणत हात झटकले आहेत. देशाला सामर्थ्यशाली बनवून अतिरेकी शक्तींना वेसण घालण्याचे गेल्या ११ वर्षात आपण अनेकदा अनुभवले आहे. आता उपलब्ध सर्व पुराव्यांचा यथोचित वापर राणाला शिक्षा सुनावण्यापर्यंत प्रक्रिया पार पाडली जाईल. ■

# जनसेवेसाठी समर्पित असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जनसंपर्क कार्यालय



दक्षिण पश्चिम मतदार संघ नागपूर क्षेत्रातील सर्व नगरसेवकांशी विकास कामाची चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

● अरुण कणेर

आमदार हा केवळ निवडून दिलेल्या जनतेचा लोकप्रतिनिधी नसून निवडून देणाऱ्या लोकांचा पाठीराखा असतो. ही संकल्पना देवेंद्रजीच्या कार्यालयामध्ये तेथे काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून पूर्णपणे पाळली जाते. जनतेला आपल्या कुटुंबावर आलेल्या संकटाच्या काळात पाठीशी उभा असणारा नेता हवा असतो. ही जबाबदारी देवाभाऊंच्या जनसंपर्क कार्यालयातील प्रत्येक व्यक्ती स्वत:च देवाभाऊ समजून कोणत्याही पदाची आणि मोबदल्याची अपेक्षा न बाळगता मनापासून समर्पित भावनेने पार पाडीत असतो.



### शेवटी आम्ही कक्ष क्रमांक दोनवर आलो

**कक्ष** क्रमांक दोन हा या जनसंपर्क कार्यालयातील कामकाजाची मध्यवर्ती यंत्रणा आहे. हा कक्ष श्रेया पाटील यांच्या नियंत्रणाखाली आहे. या कार्यालयातील सर्वच प्रकारातील कामकाजाच्या नोंदी या कक्षात केली जाते. हा कक्ष केवळ जनसंपर्क कार्यालयामध्ये आलेल्या नागरिकांच्या केवळ समस्या सोडविण्यापुरता मर्यादित नाही तर, एकदा का येथे आलेल्या नागरिकाची नोंद यांच्या संगणकावर झाली की, वर्षभर त्या व्यक्तीच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न या कक्षाद्वारे केला जातो. अशाप्रकारची कार्यप्रणाली मी प्रथमच बघत होतो.

❶ दिवसभरातील या कार्यालयात आलेल्या नागरिकांची आणि कार्यालयात त्या दिवशी झालेल्या कामकाजाची नोंदणी या ठिकाणी केली जाते. त्या दिवशी या कार्यालयात किती नागरिकांनी भेटी दिल्या, त्यांच्या समस्या कोणत्या? याबाबतच्या संपूर्ण नोंदी या ठिकाणी केल्या जातात आणि सर्वात शेवटी दिवसभर झालेल्या कामकाजाचा गोषवारा या ठिकाणी तयार केला जातो. एकदा गोषवारा तयार झाल्यानंतर त्या समस्या सोडविण्याकरिता विविध स्तरावर पाठपुरावा केला जातो.

❷ येथे आलेल्या नागरिकाची एकदा का येथील संगणकावर नोदणी झाली की, त्या व्यक्तीच्या मोबाईलवर वाढदिवसाचे शुभेच्छा पत्र, लग्नाबाबत असेल तर, अभिनंदन पत्र आणि त्या व्यक्तीच्या संबंधात कोणतीही दु:खदायक घटना असेल तर, सांत्वन पत्र मुख्यमंत्री देवाभाऊंच्या नावाने त्या नागरिकास पाठविले जाते. आता विचार करा की, जर एखाद्या व्यक्तीच्या वाढदिवसाची दखल मुख्यमंत्री घेत असेल तर, त्या व्यक्तीला मुख्यमंत्र्याविषयी काय वाटत असेल याची कल्पना करा.

❸ दर पंधरा दिवसानंतर मागील पंधरवड्यातील कामकाजाचा आढावा कार्यालयीन प्रमुखाद्वारे घेतला जातो. त्याबाबतचा लेखी अहवाल तयार केला जातो. या पंधरा दिवसामध्ये नागरिकांच्या कोणत्या समस्या सोडविल्या गेल्या आणि कोणत्या समस्या सोडविल्या गेल्या नाहीत त्यामागची कारणे शोधली जातात. जर कोणताही अधिकारी काम करण्यास कुचराई करीत असेल आणि त्या समस्यांवर निर्णय घेत नसेल तर, कार्यालयीन प्रमुख त्या अधिकाऱ्याला प्रत्यक्ष भेटून ती समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. येथे आलेल्या नागरिकांची समस्या रास्त आणि कायदेशीर असेल तर, ती सोडविण्याकरिता या जनसंपर्क कार्यालयातील प्रत्येक व्यक्ती झटत असल्याचे यावेळी मला दिसून आले.

### सभा आणि समुपदेशन उपक्रम

आजपर्यत मी बऱ्याच आमदारांच्या कार्यालयास भेटी दिल्या परंतु, सभा आणि समुपदेशनाचा साप्ताहिक उपक्रम

मात्र मी प्रथमच देवाभाऊंच्या या जनसंपर्क कार्यालयात बघितला. या संपूर्ण उपक्रमाचा अभ्यास केला असता असे निर्दशनास येते की, या कार्यालयाने नागरिकांच्या जीवनातील प्रत्येक समस्या सोडविणे आणि त्यांची आर्थिक उन्नती करण्याचा वसा धारण केल्याचे दिसून येते. या ठिकाणी रविवार वगळता आठवड्याचे सहाही दिवस या ठिकाणी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात.

### माझेही विश्लेषण

या अडीच तासाच्या काळात मी येथील कामकाज प्रणाली समजावून घेताना या कार्यातील एकच गोष्ट मला खूप आवडली ती म्हणजे या ठिकाणाच्या कामकाजांची संपूर्ण व्यवस्था ही जनतेला समर्पित भावनेची आहे. या कार्यालयास भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्ती समाधानी होवून बाहेर गेला पाहीजे, याकडे इथे काम करणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाचा कटाक्ष असतो. येथे काम करणारा प्रत्येक व्यक्ती हा केवळ वेतनाकरिता करीत नसून, येथे आलेली प्रत्येक व्यक्ती माझ्याच कुटुंबाचा एक भाग आहे, अशाच समर्पित भावनेने दिवसभर काम करीत असतो. त्यामुळे शासकीय कार्यालयात दिसणारा नोकशाहीचा अहंकार येथे कोणत्याही व्यक्तीमध्ये मला दिसला नाही.

मुख्यमंत्री देवाभाऊंनी आपल्या मतदार संघामध्ये वार्डनुसार पक्षाच्या विविध संघटना स्थापन केल्या आहेत. यामध्ये बूथ समितीपासून ते एकूण २७ संघटनांचा समावेश आहे. या संघटनेच्या कामात सातत्य राहावे म्हणून या जनसंपर्क कार्यालयामध्ये विविध संघटना आणि समित्या यांच्या बैठका नियमितपणे सुरू असतात. या बैठकांच्या माध्यमातून या आघाड्याकडून देवाभाऊंच्या मतदार संघामध्ये घडत असलेल्या प्रत्येक घडमोडीची माहिती या कार्यालयास उपलब्ध होते. या कार्यालयामध्ये बूथ समितीपासून ते सर्वच आघाडी, समित्या आणि संघटनेमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांची नोंद या कार्यालयात करण्यात आलेली आहे. या आघाड्यांच्या माध्यमातून उद्याच्या भावी राजकीय नेतृत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो आणि त्यांना संधी दिली जाते.

या शिवाय देवाभाऊंच्या दक्षिण पश्चिम मतदार संघामध्ये अनेक विकासाची कामे सातत्याने सुरु असतात. या कामाच्या संबंधात आवश्यक असलेली सुधारणा त्याचप्रमाणे नवीन विकासाची कामे घेवून अनेक कार्यकर्ते आणि नागरिक याच कार्यालयात भेटी देतात. मतदार संघामध्ये जनतेला आवश्यक असलेल्या विकासकामाचा अहवाल याच कार्यालयात तयार केला जातो आणि देवाभाऊंच्या मान्यतेनंतर ही विकास कामे कार्यान्वित केली जातात. शेवटच्या क्षणी निरोप घेतांना असे कळले की, देवाभाऊंच्या या जनसंपर्क कार्यालयातील प्रत्येक कामाची यंत्रणा देवाभाऊंनी स्वत: निर्माण केली असून देवाभाऊंची या कार्यालयातील प्रत्येक कामावर नजर असते. या कार्यालयातील आठवड्याच्या कामकाजाचा गोषवारा देवाभाऊंना पाठविण्यात येतो. यावरुन एक लक्षात येते की, मुख्यमंत्री पदावर असलेली ही व्यक्ती आपल्या मतदार संघातील प्रत्येक व्यक्तीची कशाप्रकारे काळजी घेतो. मग, या मतदार संघातील जनता देवाभाऊला का निवडून देणार नाही?

या लेखामध्ये नमूद केलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त जनसंपर्क कार्यालयात रितेश गावंडे, नितीन महाजन, कल्पना तडस, श्रेया पाटील, जान्वही डेहाडराय, रुपाली कन्हेरे, वर्षा नानोटी, लक्ष्मण सातपुते, विलास जोशी, नरेश हिवरे, धनेश भोंगळे, योगेश धोतकर, अनिल मानेकर, सुभाष भानारकर, सुमीत मिश्रा, शिशीर त्रिपाठी, डॉ. माधुरी इंदुरकर, नरेश पांडे, जयंत गुडधे-पाटील व टीम, नंदु मानकर व टीम, किशोर धर्मे, ॲड. धीरज पराते व टीम आणि श्रीकांत दुबे इत्यादी लोक या ठिकाणी येणाऱ्या जनतलेला आपल्या समस्या निवारण्याकरिता मनापासून आपले योगदान देतात. या ठिकाणी एक गोष्ट विशेष प्रकारे नमूद करावीशी वाटते की, या कार्यालयातील ज्येष्ठ नागरिकांची जबाबदारी विकास खेडकर सांभाळतात. त्यांचा उल्लेख माझ्याकडून मागील अंकामध्ये राहून गेला आहे.

जनतेला आपल्या कुटुंबावर आलेल्या संकटाच्या काळात पाठीशी उभा असणारा नेता हवा असतो. ही जबाबदारी देवाभाऊंच्या जनसंपर्क कार्यालयातील प्रत्येक व्यक्ती स्वत:च देवाभाऊ समजून कोणत्याही पदाची आणि मोबदल्याची अपेक्षा न बाळगता मनापासून समर्पित भावनेने पार पाडीत असतो. यामुळे देवाभाऊ सहाव्यांदा या मतदार संघातून सर्वाधिक मताने निवडून आले आहेत.

**(समाप्त)**

# भारताच्या संरक्षण क्रांतीची झेप



अलीकडेच गुजरातच्या कच्छमध्ये दिवाळीच्या काळात लष्कराच्या जवानांच्या सोबत उपस्थित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, मातृभूमीच्या सेवेची ही संधी मोठ्या भाग्याने मिळते. ही सेवा सोपी नाही आहे. मातृभूमीला सर्वस्व मानणाऱ्या ध्येयवेड्यांची ही साधना आहे. भारतमातेचा लाडका, लाडकी यांचे तप आहे, त्यांची तपश्चर्या आहे.

**कुठे** हिमालयाचा बर्फ आणि हिमनद्यांचे शून्याच्या खाली असलेले तापमान, कुठे हाडे गोठवणाऱ्या थंडीच्या रात्री, कुठे उन्हाने तापलेल्या रणाचे वाळवंट, आग ओकणारा सूर्य, कुठे धुळीची वादळे, कुठे दलदलींची आव्हाने आणि कुठे उधाण आलेला समुद्र, ही साधना आपल्या जवानांना या सीमेपर्यंत तावून सुलाखून काढते की आपल्या देशाचा सैनिक पोलाद बनून चमकतो. असे एक पोलाद ज्याला पाहताक्षणी शत्रूच्या हृदयात धडकी भरते. शत्रूदेखील तुम्हाला पाहून विचार करतो की जे अशा क्रूर आघातांनी विचलित होत नाहीत, त्यांना कोणी कसे काय हरवू शकेल. आज देशात एक असे सरकार आहे जे देशाच्या सीमेबाबत एका इंचाने देखील तडजोड करू शकत नाही. एक काळ होता ज्यावेळी डिप्लोमसीच्या नावाने सर क्रीकला लबाडीने हडप करण्याच्या धोरणावर काम होत होते.

### बुद्धामध्ये तोडगा देणारा भारत

एकीकडे भारत संरक्षणासाठी स्वतःला सक्षम बनवत आहे, तर दुसरीकडे बुद्धांच्या भूमीवरून शांततेचा संदेश देत आहे. २१व्या शतकाचा हा काळ आज पुन्हा एकदा जगातील अनेक अस्थिरता आणि साशंकता यांनी वेढलेला आहे. अशावेळी बुद्ध केवळ प्रासंगिकच नाहीत तर अपरिहार्य देखील बनले आहेत. पंतप्रधान मोदी म्हणतात, भारताने जगाला युद्ध नाही, बुद्ध दिले आहेत आणि आज मी मोठ्या विश्वासाने सांगतो, संपूर्ण जगाला युद्धात नाही, बुद्धातच तोडगा मिळेल. भगवान बुद्ध म्हणतात, नही वेरेन वैरानि सम्मन्तीध कुदाचनम्. अवेरेन च सम्मन्ति एस धम्मो सनन्ततो. अर्थात वैराने वैर, शत्रुत्वाने शत्रुत्व शांत होत नाही. वैर अवैराने, मानवी औदार्याने संपते. बुद्ध सांगतात, भवतु सब्ब मंगलम्. म्हणजेच सर्वांचे मंगल होऊ दे, सर्वांचे कल्याण होऊ दे– हाच बुद्धांचा संदेश आहे, हाच मानवतेचा मार्ग आहे.

आता भारताचा एकच संकल्प आहे– राष्ट्र प्रथम, राष्ट्राचा प्रारंभ त्याच्या सीमांपासून होतो. म्हणूनच सीमावर्ती पायाभूत सुविधांचा विकास देशाच्या सर्वात महत्त्वाच्या प्राधान्यक्रमांपैकी एक आहे. सीमा रस्ते संघटनेने ८० हजार किलोमीटर पेक्षा जास्त रस्त्यांची निर्मिती केली आहे. लडाख आणि अरुणाचल प्रदेशात देखील संरक्षण धोरणात्मकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे रस्ते बांधण्यात आले आहेत. गेल्या १० वर्षात बीआरओने जवळपास ४०० मोठे पूल बांधले आहेत. गेल्या १० वर्षात अटल आणि सेलासारख्या संरक्षण धोरणात्मकतेच्या दृष्टीने

महत्त्वाच्या अनेक बोगद्यांची निर्मिती पूर्ण केली आहे. बीआरओ देशाच्या वेगवेगळ्या भागात बोगदे खोदण्याचे काम जलदगतीने पूर्ण करत आहे. सीमावर्ती गावांना शेवटची गावे मानण्याची विचारसरणी देखील बदुलली आहे. आज त्यांना देशाचे पहिले गाव म्हटले जाते. वायब्रंट व्हिलेज' योजने अंतर्गत देशाच्या पहिल्या गावांचा विकास केला जात आहे. म्हणजेच सीमेवर वसलेले असे वायब्रंट गाव जिथे वायब्रेट भारताचे पहिले दर्शन होईल.

### भविष्याची रूपरेषा

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार जगातील १३८ देशांमध्ये संरक्षण सामर्थ्यामध्ये भारत चौथ्या क्रमांकावर आहे. डोंगराळ आणि उंचावरील भागात लढाई करण्याच्या क्षमते संदर्भात जगातील कोणताही देश आपल्या समोर उभा राहू शकत नाही. म्हणूनच केंद्र सरकार आपल्या सलग तिसऱ्या कार्यकाळात एक मजबूत, अभिनव आणि आत्मनिर्भर संरक्षण तंत्र विकसित करण्याच्या आपल्या सध्याच्या प्रयत्नांना नव्याने बळकटी प्रदान करत आहे. यामध्ये संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता! साध्य करण्याच्या प्रयत्नांतर्गत उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये संरक्षण मार्गिकांची निर्मिती, सकारात्मक स्वदेशीकरण यादी (पीआयएल) प्रसिद्ध करणे, आयुध निर्माण मंडळाचे.

निगमीकरण, डीआरडीओ यांच्या माध्यमातून खाजगी उद्योगांना सहाय्य करणे आणि संरक्षण संपादन प्रक्रिया २०२० सुरू करणे यांचा यात समावेश आहे. सुमारे ५,५०० हून अधिक वस्तू अधिसूचित करणाऱ्या स्वदेशीकरण याद्यांचा उद्देश सशस्त्र दलांना भारतीय भूमीवर उत्पादित युद्ध सामुग्री आणि उपकरणांनी सुसज्ज करणे हा आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये वार्षिक संरक्षण उत्पादन १.२७ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचल्याबद्दल संरक्षणमंत्र्यांनी आनंद व्यक्त केला. सार्वजनिक क्षेत्रातील संरक्षण उपक्रमा (१)७?ए१५) चा वाटा १ लाख कोटी रुपये होता, तर खाजगी कंपन्यांनी सुमारे २७,००० कोटी रुपयांचे योगदान दिले. खासगी उद्योगांचा वाटा आणखी वाढवण्यासाठी भरपूर वाव आहे आणि एकूण संरक्षण उत्पादनात खासगी क्षेत्राचा सहभाग किमान ५० टक्क्यांपर्यंत आणणे हे आपले पुढील उद्दिष्ट असायला हवे असे त्यांनी सांगितले. हे उद्दिष्ट साध्य


> आज संरक्षण उत्पादनात भारताची ओळख निर्माण झाली आहे. पूर्वी भारत संरक्षण क्षेत्रातल्या छोट्या-मोठ्या गोष्टी परदेशातून आणत होता, आणि मी आनंदाने सांगू शकतो की आज आपण जी संरक्षण सामग्री उत्पादित करत आहोत ती हळू-हळू जगातल्या अनेक देशांना निर्यात करु लागलो आहोत. संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून जगभरात आपण हळू-हळू पुढे येऊ लागलो आहोत. **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

करण्यासाठी सरकार पूर्ण सहकार्य करेल, असेही ते म्हणाले.

आपले राष्ट्र ही एक जिवंत जाणीव आहे जिची आपण भारतमाता म्हणून पूजा करतो. आपल्या सैनिकांची जिद्द आणि बलिदानामुळेच आज देश सुरक्षित आहे. देशवासी सुरक्षित आहेत, असे सुरक्षित राष्ट्रच प्रगती करू शकते. भारतीय जवान सीमेवर लढत आहेतच शिवाय देशात दहशतवादासारख्या आव्हानांचा सामना करत आहेत आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी देवदूत बनून आपले रक्षणही करत आहेत. कालानुरूप नवनवीन तसेच वाढत जाणारी आव्हाने पाहता केंद्र सरकार, संरक्षण क्षेत्र आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्याबरोबरच जवानांना सुविधा पुरवण्यासाठी आणि त्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी अनेक निर्णय घेत आहे. याच ध्येयधोरणांच्या परिणामामुळे सीमा सुरक्षा आणि देशांतर्गत विविध आव्हाने असतानाही संरक्षण क्षेत्राच्या क्षमतेत सातत्याने वाढ होत आहे.

देशाची आर्थिक ताकद वाढली तरच सैन्याची ताकदही वाढते हे नक्की. गेल्या १० वर्षाच्या अथक आणि प्रामाणिक प्रयत्नांमुळे भारत जगातील पाचवी मोठी आर्थिक शक्ती बनला आहे आणि भारताची लष्करी क्षमताही वाढली आहे. येत्या काही वर्षांत भारत जेव्हा जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनेल तेव्हा भारताच्या लष्करी क्षमतेनेही नवी उंची गाठलेली असेल. **(समाप्त)**

# 1,681 रेल्वे इंजिनांचे उत्पादन करून अमेरिका आणि युरोपपेक्षा भारत आघाडीवर




**२०२४-२५** या आर्थिक वर्षात १,६८१ लोकोमोटिव्ह अर्थात रेल्वे इंजिनांचे विक्रमी उत्पादन करून भारताने रेल्वे लोकोमोटिव्ह उत्पादनात जागतिक आघाडीवर स्थान मिळवले आहे. हा टप्पा अमेरिका, युरोप, दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियासारख्या प्रदेशांच्या एकूण लोकोमोटिव्ह उत्पादनापेक्षा जास्त आहे, ज्यामुळे जागतिक रेल्वे क्षेत्रात भारताचे वाढते वर्चस्व पुन्हा सिद्ध होते.

भारतीय रेल्वेच्या लोकोमोटिव्ह उत्पादन युनिट्सनी २०२४-२५ या आर्थिक वर्षात विविध श्रेणींमध्ये १,६८१ इंजिनांचे उत्पादन करून एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात उत्पादित झालेल्या १,४७२ रेल्वे इंजिनाच्या तुलनेत ही वाढ २०९ म्हणजेच १९% आहे. देशातील लोकोमोटिव्ह उत्पादनातील हे विक्रमी उत्पादन आतापर्यंतचे सर्वाधिक आहे, जे रेल्वे पायाभूत सुविधा आणि क्षमता वाढविण्यातील सर्व युनिट्सच्या महत्त्वपूर्ण कामगिरीचे द्योतक आहे.

रेल्वे इंजिनाच्या उत्पादनातील सातत्यपूर्ण वाढ म्हणजे मेक इन इंडिया उपक्रमाला बळकटी देण्यासाठी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांचा थेट परिणाम होय. २००४ ते २०१४ दरम्यान, भारताने एकूण ४,६९५ रेल्वे इंजिनांचे उत्पादन केले, ज्याची राष्ट्रीय वार्षिक सरासरी ४७० होती. याउलट, २०१४ ते २०२४ पर्यंत, रेल्वे इंजिन उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन ९,१६८ रेल्वे इंजिनांचे उत्पादन झाले, ज्यामुळे वार्षिक सरासरी अंदाजे ९१७ झाली.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात, भारतीय रेल्वेने त्यांच्या उत्पादन युनिट्समध्ये १,६८१ लोकोमोटिव्हचे विक्रमी उत्पादन केले. उत्पादनाची विभागणी याप्रमाणे: चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्सने ७०० लोकोमोटिव्हचे उत्पादन केले, बनारस लोकोमोटिव्ह वर्क्सने ४७७ लोकोमोटिव्हचे उत्पादन केले, पटियाला लोकोमोटिव्ह वर्क्सने ३०४ लोकोमोटिव्हचे योगदान दिले आणि मधेपुरा आणि मारहोवडा युनिट्समध्ये प्रत्येकी १०० लोकोमोटिव्हचे उत्पादन केले गेले.

देशात उत्पादित होणारी बहुतेक रेल्वे इंजिने ही मालवाहू गाड्यांसाठी असतात. २०२४-२५ या आर्थिक वर्षात उत्पादित झालेल्या १,६८१ रेल्वे इंजिनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

WG-9/9H लोकोमोटिव्ह: १,०४७
WG-9HH लोकोमोटिव्ह: ७
WG-9 ट्वीन लोकोमोटिव्ह: १४८
WP-5 लोकोमोटिव्ह: २
WP-7 लोकोमोटिव्ह: २७२
NRC लोकोमोटिव्ह: ५
WG-12B लोकोमोटिव्ह: १००
WDG 4G/6G लोकोमोटिव्ह: १००

# गोंदिया-बल्हारशाह रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण, ४,८१९ कोटींचा प्रकल्प मंजूर



**विदर्भातील** गोंदिया ते बल्हारशाह या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी ४,८१९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील रेल्वे जाळे अधिक मजबूत होणार असून मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा व आंध्र प्रदेशाशी व्यापार–व्यवसाय वाढण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहे. जिओ कन्व्हेशन सेंटर, बीकेसी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. महाराष्ट्रात रेल्वे विकासासाठी विक्रमी निधी देण्यात आला असून याद्वारे १३२ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचाही समावेश आहे. रेल्वेच्या पायाभूत विकासासाठी एकूण १.७३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्र शासनाकडून करण्यात येत आहे. यावर्षी रेल्वे बजेटमधून महाराष्ट्राला २३,७०० कोटी रुपये प्राप्त झाले असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. रेल्वे मंत्रालयाच्या माध्यमातून लवकरच छत्रपती शिवाजी महाराज सर्किट सुरू होणार आहे. यामध्ये महाराजांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाचे किल्ले, सांस्कृतिक स्थळे यांचा समावेश असलेला १० दिवसांचा टूर आयोजित केला जाणार आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यास मदत होणार आहे. ■

## लोकल, मेट्रो, मोनो आणि बससाठी 'मुंबई वन' कार्ड

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिनाभरात 'मुंबई वन' या सिंगल स्मार्टकार्डची अंमलबजावणी सुरू होईल, अशी घोषणा केली आहे. या एका कार्डच्या आधारे मुंबईमध्ये कोणत्याही वाहतुकीच्या पर्यायाने लोकांना प्रवास करता येणार आहे.

लंडनच्या 'ऑयस्टर' कार्डवर आधारित या उपक्रमाचे उद्दिष्ट लाखो मुंबईकरांसाठी दैनंदिन प्रवास सुकर आणि सुलभ करणे आहे. हे एकच कार्ड मुंबई लोकल, मेट्रो, मोनो रेल, बसप्रवासासाठी वापरता येणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी रेल्वेला ऑनबोर्डिंग करण्याचे आदेश दिले होते. त्याचा शुक्रवारी आढावा घेण्यात आला. याचे संपूर्ण स्थापत्य येत्या एक महिन्यात आम्ही पूर्ण करून घेऊ. हे पूर्ण होताच आम्ही 'मुंबई वन' हे कार्ड लॉन्च करू. एका कार्डवर म्हणजेच एका तिकिटावर मुंबईची लोकल ट्रेन, मेट्रो, मोनो आणि बेस्ट बससेवेचा लाभ घेता येणार आहे. याचसोबत या कार्डवर मुंबई महानगर प्रदेशातील परिवहन व्यवस्थेलाही लागू होईल. यात सर्वात मोठी भूमिका ही रेल्वेची होती. रेल्वेने आपल्याला सर्व मान्यता दिलेल्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. दि. १६ जुलै रोजी 'भारत गौरव' ट्रेनने छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास आणि भव्य वारसा तसेच महाराष्ट्रातील इतर सांस्कृतिक आणि तीर्थस्थळांचे दर्शन घडवण्यासाठी दहा दिवसांची खास सहल पॅकेज तयार केले आहे. ■

# मुंबई शहरातील तीन सायबर प्रयोगशाळांचे देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन




**सायबर** गुन्हेगारीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यासाठी सायबर गुन्ह्यांमधील तपासात सायबर प्रयोगशाळा महत्वाची भूमिका बजावणार आहे. त्यासाठी शासन प्रयोगशाळा निर्माण करीत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सायबर प्रयोगशाळांचे जाळे अधिकाधिक सक्षम करण्याच्या सूचनाही उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दक्षिण मुंबई विभागाच्या निर्भया सायबर प्रयोग शाळेचे डी. बी. नगर पोलीस स्टेशन येथे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच मुंबई (मध्य) भागासाठी वरळी पोलीस स्टेशन येथील व मुंबई (पूर्व) भागासाठी गोवंडी पोलीस स्टेशन येथील सायबर प्रयोगशाळांचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, अप्पर मुख्य सचिव (गृह) इक्बाल सिंह चहल, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती आदींसह पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुंबई शहरात पाच सायबर प्रयोगशाळा प्रस्तावित आहेत. यापैकी तीन प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांच्या माध्यमातून विशेषत्वाने सायबरच्या माध्यमातून महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे गुन्हे कमी कालावधीत सिद्ध करता येणार आहे. तसेच गुन्हा लपवण्यासाठी किंवा पुरावा नष्ट करण्यासाठी कुठल्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणातील डाटा डिलीट केल्यास, मोबाईलची तोडफोड केल्यास किंवा मोबाईल टेम्पर केल्यास अशा सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधील सर्व डेटा आधुनिक संगणक प्रणालीच्या सहाय्याने 'रिकव्हर' केला जाणार आहे. प्रयोगशाळा आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून अद्ययावत संगणक प्रणालीने (सॉफ्टवेअर) सक्षम आहेत. जगातील या क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान या प्रयोगशाळांमध्ये उपयोगात आणले जाणार आहे. आर्थिक गुन्हेगारी संदर्भात ऑनलाईन पद्धतीने परस्पर पैशांची हेराफेरी करणे, बँक खाते हॅक करणे अशा पद्धतीच्या गुन्ह्यांवरही प्रयोगशाळेच्या माध्यमातून नियंत्रण मिळविण्यात येणार आहे. ■

# सलोखा योजनेला दोन वर्षे मुदतवाढ

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय**



**महाराष्ट्रातील** हजारो शेतकरी कुटुंबांतील शेतीच्या वादांवर तोडगा काढणाऱ्या सलोखा योजनेला २०२७ पर्यन्त, दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. शेतजमिनीचा ताबा, वहिवाटी, परंपरागत तंटे आणि कुटुंबांमध्ये वैर निर्माण करणाऱ्या शेतीच्या शेकडो वादग्रस्त प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी सलोखा योजना वरदान ठरल्याने राज्यातील शेकडो शेतकऱ्यांनी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी महसूलमंत्र्यांकडे केली आहे. विशेष म्हणजे, शेतीचे वाद मिटवण्यासाठी एरवी, मुद्रांक आणि नोंदणीचा मोठा खर्च या योजनेत केवळ दोन हजार रुपये इतका नाममात्र येतो. या योजनेअंतर्गत आतापर्यंत अनेक कुटुंबांमध्ये अतिशय जटिल ठरलेल्या एक हजार सात प्रकरणातील शेतीच्या आपसी वादांसह शेतजमिनीच्या अदलाबदलीच्या प्रकरणांचा समाधानकारक तोडगा निघाला आहे. महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या या वादविवादांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सुमारे ८ कोटी ९९ लाख रुपयांची मुद्रांक सवलत दिली आहे. सलोखा योजना शेतकऱ्यांसाठी एक क्रांतिकारी पाऊल ठरली आहे. कमी खर्चात आणि जलदगतीने वाद मिटवण्याची संधी शेतकऱ्यांना मिळत असल्याने त्यांचा विश्वास या योजनेवर वाढला आहे. भविष्यातही शेतकऱ्यांच्या हितासाठी अशा प्रकारच्या उपाययोजना राबवण्याचा सरकारचा मानस आहे. ■

# शेतक-यांसाठी खुशखबर! पांदण रस्त्यांसाठी माती आणि खडी रॉयल्टी फ्री

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती**



**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारने ग्रामीण भागातील शेतकरी आणि ग्रामस्थांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. पाणंद रस्ते, घरकूल आणि विहिरींच्या बांधकामासाठी लागणारी खडी आणि माती रॉयल्टी फ्री उपलब्ध करून देण्याचा आदेश शासनानं जारी केला आहे. महसूल आणि वन विभागानं हा शासन निर्णय जारी केला असून, यामुळे शेतकरी आणि ग्रामस्थांना मोठा फायदा होणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात माहिती दिली. गावतळी, शेततळी, तलाव, बंधारे यांचं उत्खनन करताना निघणारी खडी, माती, मुरूम आता शेतकऱ्यांच्या पाणंद रस्त्यांच्या कामासाठी वापरता येणार आहे. त्यासाठी सरकारकडून कुठलही रॉयल्टी आकारली जाणार नाही. महसूल विभागाच्या या निर्णयामुळे राज्यातील पाणंद रस्त्यांच्या कामाला मोठी गती मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व पाणंद रस्ते बांधण्याचा निर्णय यापुर्वीच घेतला आहे. आता या रस्त्यांसाठी लागणारी सामग्री रॉयल्टी फ्री करण्याचा निर्णय घेतल्यानं पाणंद रस्त्यांच्या कामाला गती मिळेल असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. ■





नागपूर- स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहण व नागपूर विभागीय कार्यालयाचे भूमिपूजन- उपस्थिती- केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी.









डॉ.बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियान कार्यशाळेचे उद्घाटन करताना केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल- उपस्थिती- प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष दिलीप कांबळे,



नाशिक–उपस्थिती– माजी केंद्रीय मंत्री डॉ.भारती पवार, शहराध्यक्ष प्रशांत जाधव, सरचिटणीस काशिनाथ शिलेदार, प्रदेश प्रवक्ते गोविंद बोरसे, प्रदेश अनुसूचित जाती मोर्चा उपाध्यक्ष गणेश कांबळे, अजिंक्य साने, सुरेखा निकम, नंदकुमार देसाई, मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर, योगेश भगत, शैलेश जुन्नरे, सुजाता करजगीकर, डॉ.प्रशांत भदाणे, हेमंत शुक्ल आदी.




सोलापूर– उपस्थिती– आ. विजयकुमार देशमुख, नगरसेवक शिवानंद पाटील, माजी सरचिटणीस दत्तात्रय गणपा, कार्यालय प्रभारी अनिल कंदलगी, ओबीसी शहराध्यक्ष राम वाकसे, भालचंद्र लुटे, आयोजक विजय इप्पाकायल, प्रभाकर गणपा, सतीश सिरसुल्ला, रमेश सुंचू, अंकुश मंजुळकर, देविदास इप्पाकायल, राजू पानगंटी, नरेश गोरे, निखिल बेत, राजू वंगारी, अंबादास भोसले आदी.




मुंबई– उपस्थिती– माजी आमदार व प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, जयेश शाह, तुकाराम राऊत, केतन बधेका, सुशील राणे, राजा पाटील, रोनक करेलिया, मनीष चौरसिया, अश्विन कांबळे, मुकेश गावकर, अनिल सुर्वे, जसवंत मोदी, जिग्नेश पारेख आदी.




इचलकरंजी– उपस्थिती– प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, शहराध्यक्ष पैलवान अमृत भोसले, आ. डॉ.राहुल आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, महिला शहराध्यक्ष अश्विनी कबडगे, युवा मोर्चा अध्यक्ष जयेश बुगड, अनिल डाळ्या, उर्मिला गायकवाड, नीता भोसले, सपना भिसे, नागुबाई लोंढे, माधवी मुंढे, संगीता साळुंखे, अलका विभूते आदी.



वर्सोवा विधानसभा वॉर्ड क्रमांक ६१– उपस्थिती– वासिम खान, सुनील दुबे, पंकज शर्मा, राजू खान, सबीर शेख, लता हया, अनुराधा चौहान, मिथिलेश सिंह, अमरचंद यादव, सलमान खान आदी.

## स्थापना दिवस



मुंबई कार्यालयात ध्वजारोहण- उपस्थिती- मुंबई अध्यक्ष व माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, आ. कालिदार कोळंबकर, माजी आमदार सुनील राणे, युवा मोर्चा मुंबई अध्यक्ष तेजिंदर तिवाना, अमरजीत मिश्रा आदी.



प्रदेश कार्यालयात ध्वजारोहण- उपस्थिती- ज्येष्ठ नेते डॉ.किरीट सोमय्या, प्रदेश समन्वयक विश्वास पाठक, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, ज्येष्ठ नेते मधु चव्हाण, शैला सामंत, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुकलर्णी आदी.






पुणे कार्यालयात ध्वजारोहण- उपस्थिती- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, नगरविकास-परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खा. मेधा कुलकर्णी, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, शहराध्यक्ष धीरज घाटे आदी.



भारतीय क्रिकेटपटू केदार जाधव यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुले, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, बहुजन विकास मंत्री अतुल सावे, खा.अशोक चव्हाण, आ. अतुलबाबा भोसले, आ. समाधान आवताडे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, किसान मोर्चा सरचिटणीस संदीप गिड्डे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



परभणी जिल्ह्यातील पूर्णा कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान संचालक बालाजी रामराव देसाई, सभापती बालाजी रामराव खैरे, उप सभापती नारायण मारोतराव पिसाळ, मा. उप सभापती लक्ष्मणराव तुळशीराम बोबडे तसेच पाथरी पंचायत समितीचे मा. सभापती अरुण सितारामजी कोल्हे, मा. सभापती माणिक सुभाषराव घुंबरे यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि सदस्य, जि. प. सदस्य, सहकार संस्थांचे चेअरमन, सरपंच आणि विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, रामप्रसाद बोर्डीकर आदी.



नागपूर- काँग्रेसच्या अध्यक्षा हर्षा इंदूरकर, उपाध्यक्ष अमित ठवकर, नगरसेवक रुपेश मेश्राम, नगरसेवक मयूर तळेकर, नगरसेविका शारदा दूधपचारे तसेच उमरेड येथील प्रदेश काँग्रेस सचिव जितेंद्र गिरडकर यांच्यासह अनेक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बानवकुळे आदी.

# माजी आमदार संजयबाबा घाटगे यांचा भाजपा प्रवेश








कागलचे उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार व जिल्हा बँकेचे संचालक संजयबाबा घाटगे, अलिबागचे माजी आमदार सुभाष तथा पंडितशेठ पाटील गोकुळ दूध संघाचे संचालक अंबरीश घाटगे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहापूरचे माजी आमदार पांडुरंग बरोरा, मालेगावचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रसाद हिरे यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुले, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार रणजितसिंह नाईक–निंबाळकर, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com